जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:- sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -:प्रेस नोट :-

दिनांक :- १९/०६/२०२६

# " घरकाम करणाऱ्या महिलेसह साथीदार जेरबंद; ४,००,०००/- लाखांचा मुद्देमाल हस्तगत. "

दिनांक १२/०६/२०२६ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील मेहरूण तलाव परिसरात राहणाऱ्या फिर्यादी सौ. सुधा प्रभुनाथ कावरा, वय ५१ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा. लेकसाईड रेसिडेन्सी, गणेश घाटजवळ, जळगाव यांनी फिर्याद दिली की, यांच्या घरातून तसेच त्यांच्या समोर राहणाऱ्या तेजल पियुष संचेती यांच्या घरातून सोन्याचे दागिने चोरी झालेले आहे. त्यांना घर कामासाठी असलेली महिला समोतोबाई राजपाल धांडेकर वय ३९ मुळ रा. धारणी ता. अमरोद जि. अमरावती सध्या रा. रामेश्वर कॉलनी, जळगाव यांचेवर संशय असल्याने, त्यानुषंगाने एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गु. रजि क्र. ५२३/२०२६ भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड यांना सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींचा शोध घेणे तसेच गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन व सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड यांनी गुन्हे शोध पथकास आवश्यक सूचना व मार्गदर्शन करून आरोपींचा तात्काळ शोध घेणे व गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आदेशित केले.

गुन्हे शोध पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन गोपनिय माहिती तसेच तांत्रीक विश्लेषणाचे अनुषंगाने, फिर्यादी यांच्या घरी घरकाम करणाऱ्या एका आंतरराज्यीय महिलेने तिच्या साथीदाराच्या मदतीने सदर चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार **आरोपीत महिला समताबाई धर्मराज धांडेकर, वय ४१ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा. येणुका नगर, रमेश्वर कॉलनी, जळगाव, मूळ रा. धारणी, ता. धारणी, जि. अमरावती** हिला ताब्यात घेऊन कौशल्यपूर्ण चौकशी केली असता, तिने सदर चोरी तिचा साथीदार **आरोपीत धर्मराज हरिसिंग मीना, वय २८ वर्षे, व्यवसाय -बांधकाम मजूर, रा. ग्राम पिपाराई, गंजबसौदा, श्यामाबाद, जि. विदिशा, राज्य मध्यप्रदेश** याच्यासह केल्याची कबुली दिली. त्यानुसार आरोपी धर्मराज हरिसिंग मीना याचा शोध घेऊन त्यास गुन्ह्यात अटक करण्यात आली असुन, त्यांचेकडुन खालील प्रमाणे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

१. **३,०९,०००/- रुपये किंमतीचे २३.१० ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस**
२. **९१,०००/- रुपये किंमतीचे ९.६४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले**

---------------------------------------------------------------------

**एकुण ४,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल**

**सदरची कार्यवाही कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक जळगाव परिमंडळ, श्री. नितीन गणापुरे उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड नेतृत्तवाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके, सफौ विजयसिंग पाटील, पोहेकॉ /गिरीश पाटील, किरण चौधरी, प्रमोद लांडवंजारी तसेच पोकॉ/ विशाल कोळी, सुभाष साबळे व योगेश घुगे या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

*************************************************************************************************


पोलीस स्टेशन जळगाव
फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
SMART POLICING
एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जळगाव
vivo V40
ZEISS
24mm f/1.88 1/100s ISO141
06/19/2026, 13:56




vivo V40 | ZEISS

24mm f/1.88 1/105s ISO50
06/19/2026, 13:56